ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १५ ऑगस्ट, १९५१ अंक ३३

## विविध माहिती

**संस्कृत पदवीला समान दर्जा**—संयुक्त प्रांत सरकारनें सरकारी संस्कृत कॉलेजमधून शास्त्री ही पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्यांना बी. ए. चा दर्जा देण्याचें ठरविलें आहे. ह्या कॉलेजच्या डिप्लोमालाहि योग्य तो दर्जा देण्यांत आला आहे. सरकारी नोकऱ्या आणि बिगर सरकारी तांत्रिक शिक्षणाच्या शाळांत प्रवेश मिळण्याबाबत आतां ह्या पदव्या इतर पदव्यांच्या बरोबरीच्या मानल्या जातील.

**हातमागाच्या धंद्याला मदत**—मद्रास सरकार हातमागाच्या धंद्याला मदत देणाऱ्या हेतूनें एक कायदा करण्याचा विचार करीत आहे. हातमागांवर निघणारें कापड एकाच दर्जाचें असावें आणि कांहीं प्रकारचें कापड काढण्यास फक्त हातमागवाल्यांनाच परवानगी असावी, ह्या हेतूनें वरील कायदा करण्यांत येणार आहे, असें समजतें.

**सुरत जिल्ह्यांत नव्या ग्रामपंचायती**—सुरत जिल्ह्यांत सध्यां ५२० ग्रामपंचायती आहेत. आतां त्यांत आणखी ७० नव्या पंचायतींची भर पडणार आहे असें समजतें. सोनगढ आणि व्यारा भागांतील कांहीं ग्रामपंचायती रद्द करण्यांत येणार आहेत. ह्या पंचायतींना पूर्वी बडोदें सरकारकडून मदत मिळत असे. बडोदें विलीन झाल्यावर गांवकऱ्यांवर कर बसविण्याचें त्यांनीं नाकारल्यामुळें त्या रद्द कराव्या लागत आहेत.

**कारवारजवळ गंधक !**—कारवारजवळ असलेल्या कैगा ह्या गांवीं गंधकाचे दगड सांपडण्याची शक्यता आहे असें समजतें. खाणीसाठी काम सुरू करण्यास मुंबईचे श्री. खेराज वेलजी ह्यांनीं मुंबई सरकारकडे परवानगी मागितली आहे.

**महागाईचा परिणाम असा झाला तर !**—डेनमार्कमध्यें वस्तूंच्या किंमती इतक्या वाढलेल्या आहेत कीं, त्या किंमती देऊन वस्तू विकत घेण्याचें त्राण नागरिकांत राहिलेलें नाहीं. दुकानदारांनीं कितीहि आकर्षक सेल जाहीर केले तरी गिऱ्हाइकें दुकानांत पाऊलहि टाकत नाहींत. अगदी आवश्यक असेल तेव्हांच वस्तू खरेदी करण्याकडे लोकांची प्रवृत्ति दिसून येत आहे.

**कारवारमध्यें लोखंड**—कारवार शहरापासून सुमारें २५ मैलांवर लोखंड सांपडणारी माती बऱ्याच प्रमाणावर सांपडूं शकते असें समजतें. खनिजांचें संशोधन करणाऱ्या लोकांकडून सरकारकडे मातीचा शोध करण्यासाठीं परवानगीचे अर्ज करण्यांत येत आहेत. ह्या भागांतील मँगेनीझच्या खाणी पूर्वीच चालू करण्यांत आल्या आहेत.

**बटाट्यांच्या पिकांबद्दल शोध**—भारतीय शेतकी खात्याच्या शेती संशोधन संस्थेतर्फे बटाट्यांचें संशोधन करण्यांत येत आहे. निरनिराळ्या प्रकारच्या बटाट्यांचीं एकमेकांवर कलमें केलीं असतां उत्पादनांत ५० ते ६० टक्के वाढ होते, असें आढळून आलें आहे. पाटणा येथील बटाट्यांचे शेतकरी नवीन हंगामासाठी ह्या कलमी बटाट्यांची लागवड करण्यास उत्सुक असल्याचें समजतें. ह्या बटाट्यांचें बियाणें इतर बियाणांपेक्षां आकारानें मोठें असतें.

**संयुक्त प्रांतांतील नवा कर**—संयुक्त प्रांत सरकारानें लाखेच्या म्हणजे पलाश वृक्षावर दर झाडामागें ४ आणे कर बसविण्याचें ठरविलें आहे. प्रांतांत सुमारें ५०० लाख पलाश वृक्ष असावेत असा अंदाज आहे. दुवर्णी ह्या भागांतच सुमारें ३.६ लाख झाडें आहेत.

**औद्योगिक वैद्यकीय परिषद**— लिस्बन येथें ता. ९ ते १५ सप्टेंबर पर्यंत इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ इंडस्ट्रिअल मेडिसिन भरणार आहे. ह्या परिषदेंत पुढील विषयांचा विचार होणार आहे. (१) औद्योगिक वैद्यकीची सामाजिक बाजू, (२) औद्योगिक कारखान्यांतील स्वच्छता, (३) औद्योगिक रोग व (४) औद्योगिक वैद्यकी.

**अमेरिकेंत वेतनाची वाढ**—अमेरिकेंतील सर्व कामगारांच्या वेतनांत, रहाणीच्या खर्चाच्या निर्देशांकांत वाढ होईल त्याप्रमाणें वाढ करण्यांत आली पाहिजे, अशी शिफारस वेज स्टॅबिलायझेशन बोर्डानें केली आहे. ह्यापूर्वी ज्या कामगारांबाबत अशी वाढ करण्यांत आली पाहिजे असे करार होते त्यांच्याच वेतनांत वरीलप्रमाणें वाढ करण्यांत येत असे.

**कॉंग्रेसच्या नाशिक अधिवेशनाचा जमा-खर्च**—अ. भारतीय कॉंग्रेसचें ५६ वें अधिवेशन नाशिक येथें भरलें होतें. अधिवेशनाच्या स्वागत समितीनें आतां जमाखर्च प्रसिद्ध केला आहे. समितीला एकूण उत्पन्न ७,१९,१७८ रुपये झाले आणि खर्च ६,१३,१७८ रुपये झाला. समितीचे अध्यक्ष श्री. हिरे ह्यांनीं ही माहिती जाहीर केली.

**प्राणि संग्रहालयासाठी वाघाचे बच्चे**—ब्रिटनमधील चेस्टर प्राणिसंग्रहालयांत ठेवण्यासाठी दोन वाघाचे बच्चे कोईमतूर येथील एका गृहस्थांनीं दिले आहेत. कोईमतूरहून मद्रास, मद्रासहून कराची व तेथून इंग्लंड असा वैमानिक प्रवास त्यांना करावा लागणार आहे. वाघाचे बच्चे दोन महिन्यांचे असून त्यांची नांवें ' मार्को ' आणि ' पोलो ' अशीं ठेवण्यांत आलीं आहेत.

### उंटावर बसणारा पाहिजे

लंडन टाइम्समध्यें नुकतीच एक विचित्र प्रकारची जाहिरात आली होती. जाहिरात ' उंट चालविणारा पाहिजे. ' अशी होती. त्यांतहि पुन्हा आणखी अटी होत्या. ह्या माणसाला अडेल उंट चालवितां आला पाहिजे आणि अडचणींच्या जागींहि उंटाला नेतां आलें पाहिजे अशा दोन अटी होत्या. अर्थात् अशा प्रकारच्या कामास योग्य माणूस मिळणें कठीण जाईल अशी अपेक्षा होतीच. हीच जाहिरात मध्यपूर्वेंतील एखाद्या देशांत आली असती तर अर्जांचे ढीग पडले असते हें खरेंच; पण खुद्द लंडनमध्यें सुद्धां ह्या जागेसाठीं बरेच उमेदवार पुढें आले. पाठीवर दोन उंचवटे असलेला एक विशिष्ट प्रकारचा उंट असतो, तो फार जलद चालतो. ह्या उंटाच्या पाठीवर बसून कापसाच्या पिकावर औषधाच्या पिचकाऱ्या कशा मारतां येतील ह्याचें प्रात्यक्षिक दाखविण्यांत यावयाचें होतें. त्यासांठी एका कुशल उंट हाक्याची जरूर होती. सरे परगण्यांतील एका शेतकी-परिषदेनें लंडन टाइम्समध्यें ही जाहिरात दिली होती. ब्रिटनमधील अनेक ठिकाणांहून ह्या जागेबद्दल एकसारख्या विचारणा येत होत्या. बऱ्याच निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांनीं फोनवरून चौकशी केली. ७५ वर्षांच्या एका वृद्धानेंहि जागेसाठी अर्ज केला होता. ह्या गृहस्थानें २७ वर्षांपूर्वी उंटाच्या पाठीवर बसून ३,००० मैलावर प्रवास केला होता. येवढ्या अनुभवाच्या जोरावर आपण उंट हाक्याच्या जागेला लायक आहों, असें त्याला वाटलें.

---

### युरोपांत ट्रॅक्टरचा वाढता उपयोग

युरोपांत ( रशिया वगळून ) एकूण १० लक्ष ट्रॅक्टर्स १९५० अखेर होते. युद्धापूर्वींच्या मानानें त्यांची संख्या १९५० चे प्रारंभीं तिप्पट झाली आणि १९५० मध्यें त्यांत १,४०,००० ट्रॅक्टर्सची म्हणजे १६.८% ची भर पडली. म्हणजे, ४२२ एकरांना एक ट्रॅक्टर असें प्रमाण पडतें. ग्रेट ब्रिटनमध्यें ट्रॅक्टर्सचें प्रमाण सर्वांत जास्त आणि इटली-पोर्तुगाल-ग्रीस-टर्की ह्या देशांतून तें सर्वांत कमी आहे. शेतांचें क्षेत्र वाढविणें, सहकारी पद्धतीनें ट्रॅक्टर्सचा उपयोग करणें, शेतीस कर्जपुरवठा योग्य प्रमाणावर करणें, इत्यादि उपाय योजल्याविना ह्यापुढें ट्रॅक्टर्सचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर वाढणें कठीण आहे.

---

### यंत्रसामुग्रीची आयात

भारतानें १९५०-५१ मध्यें एकूण ८४ कोटी ३९ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री आयात केली. त्यापैकीं ५२ कोटी, रुपयांची यंत्रसामुग्री ग्रेट ब्रिटननें पुरविली.

---

### दावणगिरी येथें इंजिनिअरिंग कॉलेज

दावणगिरी येथें नवें इंजिनिअरिंग कॉलेज येत्या ऑक्टोबरपासून सुरू होईल. म्हैसूर संस्थानांत सध्या तीन इंजिनिअरिंग कॉलेजें आहे, त्यांत आणखी एकाची आतां भर पडत आहे.

---

**सुताची सहकारी गिरणी**—पूर्व पाकिस्तानांत सहकारी तत्त्वावर चालणारी एक सुताची गिरणी लवकरच काढण्यांत येणार आहे. ह्या गिरणींत १५,००० चात्या बसविण्यांत येणार असून, तयार होणारें सूत हातमागांना पुरविण्यांत येणार आहे. गिरणीचें भांडवल ५० लाख रुपये राहील. प्रत्यक्ष उत्पादनाला मात्र १९५२ सालीं सुरवात होईल.

ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दर साल दर शेंकडा ५॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास आपली रकम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवूड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



# अर्थ

बुधवार, ता. १५ ऑगस्ट, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी चळवळ सरकारी हस्तक होण्याची भीति

श्री. सरय्या ह्यांनीं ऑक्सफर्ड येथील परिषदेसाठीं जो निबंध पाठविला होता, तो आतां बाँबे कोऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें समग्र छापून काढला आहे. त्यामुळें श्री. सरय्या ह्यांच्या निबंधाचें रहस्य समजून घेणें सोपें झालें आहे. सरकारचें आर्थिक बाबतींत नियंत्रण आणि मार्गदर्शन वाढत्या प्रमाणावर आहे, आणि सहकारी चळवळीनें आपल्या स्वतःच्या सामर्थ्याच्या बाहेर जबाबदाऱ्या पत्करल्या, तर सरकारी हस्तक्षेपास तें निमंत्रणच होणार आहे. तेव्हां सहकारी चळवळीचें वैशिष्ट्य कायम रहावें ह्या दृष्टीनें तिच्या प्रगतीची गति आखडती घेऊन आटोक्यांत ठेवली पाहिजे, असें श्री. सरय्या ह्यांचें म्हणणें आहे. लहान लहान व्यक्तींना आणि गटांना एकत्र येऊन स्वतःचा उद्धार घडवून आणण्याचे कामीं सहकारी कार्यपद्धतीची उपयुक्तता निर्विवाद आहे. तिच्या ध्येयनिष्ठ पद्धतीस त्यामुळें इतर आर्थिक पद्धतींपेक्षां अधिक मान दिला जातो. सर्वच देशांत सर्व राजकीय पक्षांना सहकारी चळवळीबद्दल आदर वाटत आला आहे. अमेरिकेंत खासगी प्रयत्नांस प्राधान्य आहे, ग्रेट ब्रिटनमध्यें सोशॅलिझम आणि 'वेल्फेअर स्टेट' चा अंगीकार करण्यांत आलेला आहे. दुसऱ्या जागतिक युद्धापूर्वीच्या काळीं जर्मनी व इटली येथें राष्ट्र हेंच महत्त्वाचें होतें—व्यक्तींना त्यांत स्थानच नव्हतें— आणि रशियांत कम्युनिझमची पद्धत अंमलांत आहे. अशा वेगवेगळ्या परिस्थितींतहि सहकारी चळवळीची वाढ त्या त्या देशांतून झालेली होती व आहे. भारतांत प्रत्येक राजकीय पक्षानें सहकारी कार्यपद्धति व सहकारी संघटना ह्यांची, जनतेच्या रहाणीचा दर्जा सुधारण्याचे कामीं कास धरलेली आहे. म्हणजे, सहकारी चळवळीचें नैतिक व आर्थिक महत्त्व सर्वांनाच पटलेलें आहे. सहकारी चळवळीबद्दल आत्मीयता आणि तिच्या मार्फत जनतेचा उद्धार घडविण्याचा विश्वास ह्याविषयीं कोणत्याहि एखाद्याच विशिष्ट पक्षानें अभिनिवेश बाळगण्याचें कारण नाहीं. सहकारी संघटनेस सरकारी साहाय्य आणि प्रोत्साहन हीं अवश्य मिळालीं पाहिजेत, परंतु तिचें ध्येय स्वावलंबन हेंच असणें अगत्याचें आहे. सहकारी चळवळ सरकारजमा होतां कामा नये, किंवा एकाद्या राजकीय पक्षाचें वा अधिकारारूढ पक्षाचें म्हणजे सरकारचें एक अंग बनतां कामा नये. सहकारी चळवळींत सर्वपक्षीयांस स्थान मिळालें पाहिजे; एकाच पक्षीयांस त्यांत वर्चस्व मिळतां कामा नये; सरकारी हस्तक्षेपापासून सहकारी चळवळ ही अलग राहिली पाहिजे; नाहींतर तिचा आत्मा नष्ट झाल्याविना रहाणार नाहीं; असें श्री. सरय्या ह्यांचें आग्रहाचें सांगणें आहे.

श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या निबंधांत, वेगवेगळ्या देशांतील सहकारी संघटनेची वेगवेगळी परिस्थिति व सरकार—सहकार संबंध ह्यांचें दिग्दर्शन करून भारतांतील सहकारी प्रयोगाचें वैशिष्ट्य सांगितलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत, विशेषतः भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, शेती सुधारणेसाठीं व जनतेचा रहाणीचा दर्जा सुधारणेसाठीं सहकारी चळवळ कामास लावावी, असें म्हणणारांची संख्या वाढत आहे. त्यांतूनच, सरकारच्या आर्थिक धोरणाच्या सिद्धीसाठीं सहकारी चळवळीनें कोणतें स्थान पत्करावें, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. सरकारी नियंत्रणाखालील नियोजन आणि सहकाराचें स्वयंस्फूर्तीचें तत्त्व, ह्यांची सांगड कशी घालावयाची, ह्याचा विचार केला तर हळूहळू खुषीच्या सहकाराचें ध्येय बाजूस सरूं लागल्याचें आढळून येतें. भारतासारख्या देशांत हवापाणी, जमीन, सामाजिक जीवन, जमिनींचें क्षेत्र, जमीनधारापद्धति, इत्यादींत इतकी विविधता आहे कीं मध्यवर्ती नियोजकांचे हुकूम खालपर्यंत मनापासून पाळले जाणें अशक्य आहे; त्यास खुषीचें सहकार्यच हवें. विशेष प्रसंगींच सक्तीचा अवलंब करणें योग्य ठरेल. सध्यां सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीचे कामीं मुंबई राज्यांतील सहकारी बँकांनीं सर्व पतवाल्या शेतकऱ्यांना (ते सहकारी पतपेढ्यांचे सभासद असोत वा नसोत) ६¼% दरानें कर्जपुरवठा करण्याची जबाबदारी पत्करली आहे. राज्य सरकारनें प्रांतिक बँकेचे कांहीं भाग खरीदले आहेत, तोट्यांत चालणाऱ्या शाखांना आणि पतपेढ्यांना सबसिडी दिली आहे. तीन सरकारनियुक्त डायरेक्टर बँकेच्या बोर्डावर आले आहेत. अन्नधान्य, कापड, सूत, साखर इत्यादि नियंत्रित माल वाटपाचें काम सहकारी सोसायट्यांना दिलें तर त्यांनीं आपल्या सभासदांबरोबर बिगर सभासदांचीहि गरज पुरविली पाहिजे अशी अट सरकार घालतें. सहाजीकच, सरकारी साहाय्य आणि नियंत्रण मागोमाग येणारच. सर्व जनतेची सोय करण्याच्या सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीचे हस्तक म्हणून सहकारी सोसायट्यांनीं कितपत जबाबदारी स्वीकारावी, हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. सरकारच्या दृष्टीनें अर्थात् त्यांत वावगें कांहींच नाहीं. परंतु, सहकारी संघटनेनें अशी जबाबदारी पत्करली म्हणजे कालांतरानें का होईना, सहकारी संघटनेच्या स्वयंपूर्णतेस धोका निर्माण झाल्याविना रहाणार नाहीं. श्री. सरय्या ह्यांनीं ह्याच्या इष्टानिष्टतेकडे तज्ज्ञांचें लक्ष वेधलें आहे आणि सहकारी चळवळीनें आपलें स्थान निश्चित करण्याचें अगत्य प्रतिपादन केलें आहे. आपल्या इकडील सहकारी चळवळीचें नेतृत्व, निदान वरच्या थरांत तरी, प्रत्यक्ष हितसंबंधीयांकडे नसून तें बाहेरील तज्ज्ञांकडे व हितचिंतकांकडे आहे. आपलेवरील जबाबदारीचें हें वैशिष्ट्य त्यांनीं ओळखून आणि प्रश्नाचें गांभिर्य ध्यानीं ठेऊन विचार केला पाहिजे. फार उशीर होण्यापूर्वींच, तात्कालिक संधि किंवा अनुकूलता एवढ्याकडेच पाहून भागणार नाहीं; दूरगामी दृष्टीनें धोरण ठरविलें पाहिजे. म्हणजे, धोरणाच्या इष्टानिष्टतेबद्दल शंका किंवा वाद निर्माण होण्यास वाव रहाणार नाहीं.

---

**शाळांत रेडिओचा उपयोग**—गेल्या कांहीं वर्षांत कॅनडांतील शाळांतून बसविण्यांत येणाऱ्या रेडिओंत वाढ झाल्याचें दिसून आलें आहे. कॅनडांतील ज्या भागांत इंग्लिश बोललें जातें त्या भागांतील शाळांपैकीं एक तृतीयांश शाळांतून तरी आतां रेडिओ वापरला जातो. टक्केवारींत बोलावयाचें तर ही वाढ ८० टक्के झालेली आहे.

## नियोजन मंडळाच्या योजनेबद्दल तज्ज्ञांचीं मतें

"पंचवार्षिक योजनेमध्यें विकास योजना आहे, व योजनेच्या तिसऱ्या भागांत पॉलिसी प्रोग्रॅम म्हणजे धोरणाच्या कार्यक्रमाची चर्चा आहे. योजनेवर टीका करणारे लोक या धोरणाच्या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष करतात. ही पंचवार्षिक योजना कृतींत उतरविण्यासाठीं वर पासून अगदीं खेडेगांवापर्यंत जबाबदार अधिकारी लोकांची यंत्रणा निर्माण केली पाहिजे. योजनेचें बरेंचसें यश योग्य प्रकारच्या अन्नधान्य व इतर व्यापारी पिकांच्या एकमेकांच्या उत्पादनाला मारक होणार नाहीं अशा किंमतीच्या धोरणावर अवलंबून राहील. म्हणजे, व्यापारी पिकांना जास्त बाजारभाव मिळतो म्हणून अन्नधान्याच्या पिकाच्या क्षेत्रावर त्यांनीं आक्रमण करतां कामा नये. समतोल बाजारभाव राहिले तर प्रत्येक प्रकारच्या पिकाचें उत्पादन योजनेप्रमाणें योग्य इतकेंच राहील. शेती व संलग्न योजनांवर ५० टके खर्च होणार आहे. या कार्यक्रमाला योजना हें नांव दिलें असलें तरी वास्तविक कार्यक्रमाचें स्वरूप असें आहे कीं सध्यां गेलीं कांहीं वर्षे ठिकठिकाणीं चालू असलेलीं कामें पुरीं केलीं जातील व त्यांचा एकत्रित विचार करण्यांत आला आहे. अनेक विखुरलेले सुटे भाग असतात त्यांचें जणूं कांहीं एकत्रीकरण करण्यांत आलें आहे. कांहीं बाबतींत खर्च हा केवळ त्या बाबींची पुनर्घटना व सुधारणा करण्यासाठीं होणार आहे. रेल्वेसाठीं होणारा बहुतेक खर्च हा नवीन लोहमार्गासाठीं नसून एकंदर सुधारणा करण्यासाठीं आहे. शिक्षण संस्थांना मिळणाऱ्या नेहमीच्या ग्रँट्स् याहि सामाजिक कार्यक्रमासाठीं होणाऱ्या खर्चांत समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. पांच वर्षांच्या अखेर दर माणशीं वाटणीस येणाऱ्या अन्नधान्य, कापड, साखर इ. वस्तूंत वाढ होणार नसून फार तर वाढती लोकसंख्या विचारांत घेऊन १९३९ च्या राहाणीच्या मानापर्यंत आपण पोंचणार आहोंत.

"या योजनेमध्यें उद्योगधंद्यांवर मुळींच भर देण्यांत आलेला नाहीं हा एक मोठा दोष आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतींत खाजगी प्रयत्नांवर अवलंबून राहाण्यांत अर्थ नाहीं. तर सरकारनें स्वतः पुढाकार घेतला पाहिजे. हिंदमध्यें मूलभूत किंवा आधारभूत उद्योगधंद्यांचें उत्पादन वाढविणें आवश्यक आहे. योजनेच्या दुसऱ्या भागांत ३०० कोटी रुपये खर्चाचा अंदाज आहे. सुमारें ९ हजार कोटी रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या देशांत पांच वर्षांत उद्योगधंद्यांवर फक्त ३०० कोटी खर्च करणें ही गोष्ट निरुत्साही आहे योजनेमधील उदात्त ध्येयें चांगलीं आहेत. उ० सहकारी शेती व भारत सेवासंघ या कल्पना. परंतु या गोष्टी कृतींत उतरविण्यासाठीं लोकांना कार्यप्रवृत्त करील असा कोणताच भाग या योजनेंत नाहीं हा मोठा दोष आहे. योजनेला पाठिंबा देणारें सर्वसामान्य समाजाचें लोकमत तयार केलें गेलें पाहिजे. पांच वर्षेपर्यंत संप करण्याचा कोणाला अधिकार नाहीं, महागाई भत्ता वाढविला जाणार नाहीं, चैनीच्या मालावर खर्च करतां येणार नाहीं, एकाहून जास्त मोटार ठेवण्याला परवानगी दिली जाणार नाहीं, नफा व डिव्हिडंड्स यांवर नियंत्रण राहील, अशा स्वरूपाचे कांहीं निश्चित मार्ग स्वीकारले पाहिजेत. जनतेमध्यें सामान्य रीत्या उत्साह निर्माण करूं शकेल व तिला कार्यप्रवृत्त करील असें योजनेंत कांहींच दिसत नाहीं. मंडळाच्या अहवालाची सर्व ठिकाणीं चर्चा झाली पाहिजे. परंतु अहवाल अजून प्रसिद्धहि झाला नाहीं. म्हणून फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कामर्स सारख्या संस्थेलाहि अहवालाची चर्चा करतां आली नाहीं."—डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव.

"आजची परिस्थितिही दुसरें महायुद्ध व फाळणी यांचा परिणाम आहे. या पंचवार्षिक कार्यक्रमामुळें आपल्या आर्थिक जीवनाला आधारस्तंभ उभारण्यांत येणार आहे. तो उभारला गेला तर पुढें आणखी सुधारणा करणें शक्य होईल व निराश होण्याचें कारण राहाणार नाहीं. आपलें दारिद्र्य दूरकरण्यासाठीं परिस्थितीशीं आपण युद्ध केलें पाहिजे.":—प्रो. सी. एन. वकील.

"ही योजना प्रत्यक्ष राज्यकारभाराचा अनुभव व अडचणी ज्यांना माहीत आहेत अशा तज्ज्ञांकडून सरकारसाठीं तयार करण्यांत आली आहे. देशांत लोकांच्या हातीं उपलब्ध असलेलीं सर्व तऱ्हेचीं मनुष्यबळ व नैसर्गिक साधनें विचारांत घेऊन त्यांच्या साहाय्यानें विकास कसा करतां येईल याचा व्यावहारिक कार्यक्रम आखण्यांत आला आहे. तेव्हां या दृष्टिकोनांतूनच या योजनेकडे पाहिलें पाहिजे. शेतीच्या बाबतींत सहकारावर भर देण्यांत आला आहे व बैळ्या उद्योगधंद्यांकडेहि लक्ष पुरविण्यांत आलें आहे.":—श्री. वैकुंठराय मेहता.

## ग्रामीण भागांतील कर्जपुरवठा

रिझर्व्ह बँक शेतीस अधिक कर्जपुरवठा कसा करूं शकेल, ह्याबाबत चर्चा करण्यासाठीं तज्ज्ञांची एक अनौपचारिक परिषद फेब्रुवारीमध्यें मुंबई येथें प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या परिषदेनें, अशा कर्जपुरवठ्याचा प्रश्न हातीं घेण्यापूर्वी, शेती-कर्जपुरवठ्याची सद्यःस्थिति नीट लक्षांत येण्यासाठीं आवश्यक ती चौकशी करण्यांत यावी, असें मत व्यक्त केलें होतें. सबंद भारताची ह्या दृष्टीनें पहाणी करण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें आतां एक समिति नेमली आहे, तिनें अशा पहाणीचा आराखडा तयार करून पहाणीची योजना आखावयाची आहे. श्री. ए. डी. गोरवाला हे समितीचे अध्यक्ष असून प्रा. धनंजयराव गाडगीळ हे तिचे सभासद आहेत. बँकेचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर (श्री. बी. वेंकटप्पय्या, आय्. सी. एस.) आणि एकॉनॉमिक अडव्हायसर (डॉ. बी. के. मादन) हेहि समितीचे सभासद रहातील. पहाणीचें मार्गदर्शन करणें आणि मिळालेली माहिती एकत्र करणें हीं कामें करून, त्याबाबत आपलें मत देणें आणि आवश्यक त्या शिफारसी करणें हीं महत्त्वाचीं कामेंहि समितीनें करावयाचीं आहेत. ह्यापूर्वी बऱ्याच चौकशा करण्यांत आल्या होत्या, तरी त्या आतां जुन्या-पुराण्या झाल्या आहेत आणि रूरल बँकिंग चौकशी कमिटीनेंहि नव्या चौकशीचें अगत्य प्रतिपादन केलें होतें. संस्थानें भारतांत विलीन झाल्या कारणानें, चौकशीचें क्षेत्र व व्याप हीं कितीतरी वाढलीं आहेत. भारतांतील प्रातिनिधिक मुलुखांतील वेगवेगळ्या आर्थिक टप्प्यांतील शेतकऱ्यांबाबत चौकशी करून त्यांच्या कर्जविषयक नडींची पहाणी प्रस्तुत कमिटी करणार आहे. ह्या नडी भागविण्यासाठीं सध्यां कोणकोणत्या सोयी आहेत आणि कोणकोणत्या प्रकारच्या नव्या सोईंची गरज आहे ह्याकडे समिती अर्थातच लक्ष देईल. शेतकींच्या संसारांतील बचत आणि तूट ह्यांची बाजूहि विचारांत घेतली जाईल; त्यांतील प्रातीची मालकी कशी बदलत जात आहे आणि खेडेगांवीं मुलुखांत भांडवलाचा संचय कसा होऊं शकेल, ह्याकडेहि समिती लक्ष देईल. ग्रामीण भागांतील पतीच्या व्यवहारांची ही पहाणी व्यापक स्वरूपाची होणार असून, तिच्या निष्पत्तीकडे सर्वांचें लक्ष वेधून राहील हें उघड आहे.

## सरकारी मदत व हस्तक्षेप ह्यांचा बागुलबोवा?

श्री. ग. र. तुळशीबागवाले, बी. ए., एलएल्. बी., पुणें सें. को. बँक लि. चे चेअरमन, ह्यांचें पत्र

संपादक, 'अर्थ' ह्यांस स. न. वि. वि.

श्री. आर. जी. सरैय्या, अध्यक्ष, मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि., ह्यांचा "सहकार व सरकार" या विषयावर ऑक्सफर्ड येथें गेल्या जुलै महिन्यांत कॉमनवेल्थ राष्ट्रांच्या सहकारी परिषदेमध्यें एक निबंध वाचला आहे. सरकारनें सहकारी चळवळ ही एक शासन पद्धतीचें अंग न मानितां सहकारी चळवळीच्या कार्य-क्षेत्रावर अतिक्रमण करूं नये असा इषारा देऊन सहकारी कार्य-कर्त्यांनीं असे प्रयत्न झाल्यास सहकारी चळवळीची स्वतंत्रता कायम ठेवणेंकरितां झगडलें पाहिजे अशी सूचना सदरच्या निबंधांत श्री. सरैय्या ह्यांनी प्रामुख्यानें केलेली दिसत आहे. स्वतःच्या जमलेल्या भांडवलापेक्षां जास्त भांडवल सरकारी मदतीच्या रूपानें घेऊन सहकारी चळवळीची वाढ करणें योग्य होणार नाहीं, असेंहि मत त्यांनी प्रदर्शित केलें आहे. श्री. सरैय्या ह्यांनीं मुंबईस जें बँकस् कॉन्फरन्सचे अध्यक्ष या नात्यानें भाषण केलें आहे, त्याचा सूरहि ह्याचप्रमाणें होता.

सहकारी चळवळीची वाढ प्रगतीपर आहे किंवा नाहीं, हें त्यांतील सहकारी संस्था कितपत जिवंत व पायाशुद्ध आहेत यावर अवलंबून आहे. सध्यां होत असलेली वाढ ही पुष्कळ अंशीं देशां-तील परिस्थिति व पोषक असें सरकारी धोरण ह्यामुळेंच होत आहे. मुंबई प्रांतापुरतें पाहिल्यास या वाढीचें श्रेय कांहीं अंशीं आपले सहकारी मंत्री श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांनाच द्यावयास पाहिजे. सरकारी मदत ही फार मोठ्या प्रमाणांत आहे असें नाहीं, तसेंच सरकारी हस्तक्षेप पूर्वीच्या पेक्षां अधिक होत आहे अगर होईल असें मानण्याचेंहि कारण दिसत नाहीं. सर्व जीवनोपयोगी वस्तूंचे वाढलेले भाव खालीं आणणेचें व तसे ठेवणेंचें एक साधन म्हणून सहकारी चळवळीस जास्त उत्तेजन सरकारकडून दिलें जात आहे. सरकारी मदतीचा उपयोग सहकारी संस्था जास्त कार्यक्षम व मजबूत होणेकडे केला गेल्यास तें योग्यच होणार आहे. ऐपतवान शेतकऱ्यांना शेतीकरितां कर्जपुरवठा करणें ही जबाबदारी सह-कारी कार्यकर्त्यांनीं आपणहून पत्करली आहे. इतरहि विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या जरी वाढत असल्या तरी त्या आपण कितपत अंगावर घ्याव्यात हें त्या त्या सहकारी संस्थांच्या कार्य-क्षमतेवर व आर्थिक परिस्थितीवरच अवलंबून राहील. पण साधनें उपलब्ध असतांना व परिस्थिति अनुकूल असल्यास जबाबदाऱ्या मोठ्या असें म्हणून पाऊल पाठीमागें घेणें हें मात्र युक्त होणार नाहीं. रिझर्व्ह बँक ॲक्टांत योग्य ती दुरुस्ती होऊन स्वल्प व्याजांत रकमा मिळणेची सोय झाली आहे. प्लॅनिंग कमिशनचा रिपोर्टहि उत्साहवर्धक असा आहे. बेंगलोरला काँग्रेसनें जाहीर केलेलें धोर-णाहि पोषक असें आहे. सरकारी मदत ह्याहिपेक्षां जास्त मिळणें अशक्य आहे, असें नाहीं. मुंबई प्रांतांत तरी सरकारी हस्तक्षेप प्रभावी आहे असें नाहीं. अशा परिस्थितींत सहकारी कार्यकर्त्यांनीं प्रतिगामी धोरण न स्वीकारतां व सहकारी चळवळीचें व्यक्तित्व व स्वतंत्रता कायम टिकवण्याचें सामर्थ्य अंगीं बाळगून कार्य करीत राहिल्यास सरकारी मदतीचा बागुलबोवा अगर हस्तक्षेपाची भीति राहाण्याचें कारण दिसत नाहीं.

ता. ५।८।५१ ग. र. तुळशीबागवाले

## मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनीं पत्करलेली अवास्तव जबाबदारी

### श्री. सरैय्या ह्यांचा समयोचित इशारा

श्री. संपादक, "अर्थ" यांसी:—

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरैय्या यांनीं जुलई, १९५१ च्या शेवटच्या आठवड्यांत ऑक्सफर्ड येथें भरलेल्या शेती विषयक परिषदेपुढें वाचण्यासाठीं पाठविलेल्या निबंधाचा सारांश दिनांक १ ऑगस्ट, १९५१ च्या अंकांत प्रसिद्ध करून मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीची आपण मोठी सेवा केली याबद्दल मी आपला फार आभारी आहे.

हिंदुस्थान सरकारनें सन १९४५ सालीं नेमलेल्या "को-ऑपरे-टिव्ह प्लॅनिंग कमिटी"चे श्री. आर. जी. सरैय्या हे अध्यक्ष होते. या वरून हिंदी सहकारी चळवळींत त्यांचें किती श्रेष्ठ दर्जाचें स्थान आहे तें स्पष्ट होत आहे. अशा असामान्य व्यक्तीनें प्रद-र्शित केलेले विचार हे अनुभवाचे बोल असणारच हें उघड आहे. त्यांनीं लिहिलेला अस्सल प्रबंध अद्याप माझे अवलोकनांत आला नसल्यानें येथील सहकारी चळवळीनें तिला न पेलतील अशा कोणकोणत्या जबाबदाऱ्या पत्करल्या याचा त्यांनीं आपल्या प्रबंधांत उल्लेख केला आहे, त्याची मला तपशीलवार माहिती नाहीं. तथापि, यासंबंधीं मुंबई राज्याचे दृष्टीनें विचार करतां आपल्या-कडील सहकारी संस्थांनीं मुंबई राज्यांतील सर्व ऐपतवान शेत-कऱ्यांना शेतीसाठीं लागणारीं हरतऱ्हेचीं सर्व कर्जे देण्याचें अलि-कडे जें पत्करलें आहे तें त्यांना पूर्णपणें पेलेल किंवा कसें हा मोठा विचार करण्यासारखा प्रश्न होऊन बसला आहे. गाडगीळ कमिटीनें या कामासाठी स्वतंत्र अशा "क्रेडिट कॉर्पोरेशन्स" वेग-वेगळ्या प्रांतिक सरकारांनीं प्रस्थापित कराव्यात असें सुचवून मुंबई व मद्रास राज्य सरकारांनीं त्यांना योग्य वाटल्यास, ही कामगिरी तेथील सहकारी संस्थांकडे सोपवावी अशी शिफारस केली होती; आणि या शिफारशीनुसार मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनीं हें काम पार पाडण्याचें पत्करलें. "महत्त्वाकांक्षा" हा कांहीं वेळां सद्गुण वाटत असला तरी कांहीं प्रसंगीं तें अयोग्य धाडसहि ठरण्याचा संभव असतो. ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पो-रेशनची कामगिरी पार पाडण्याचें कबूल करून मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनी फार मोठी व अवास्तव अशी जबाबदारी वृथाभिमानास बळी पडून आपणाकडे घेतली आहे, असें माझें वैयक्तिक मत आहे. ही जबाबदारीची कामगिरी योग्य प्रकारें पार पाडण्यास लागणारें आवश्यक व पुरेसें मनुष्यबळ व आर्थिक बळ मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांचे जवळ आहे असें मला वाटत नाहीं. यासाठीं त्यांना रिझर्व्ह बँकेवर म्हणजे पर्यायानें सरकारावर अवलंबून रहावें लागेल व मग त्यांनीं प्रत्यक्ष, अगर अप्रत्यक्ष हुकमत या संस्थांचेवर देणें हें अगदी स्वाभाविक आहे, व तेवढ्यापुरतें त्यांचें स्वातंत्र्य कमी होईल हें उघड आहे.

आपल्या राज्यांतील सर्व ऐपतवान शेतकऱ्यांना लागणाऱ्या वार्षिक कर्जाची रक्कम अंदाजी रुपये पंचवीस कोटी होईल असें वाटतें. एवढी मोठी रक्कम कर्जांत गुंतून राहाणार असल्यास त्यासाठी सहकारी चळवळीचें एकूण खेळतें भांडवल सुमारें चाळीस ते पन्नास कोटी व्हावयास पाहिजे. एवढी मोठी रक्कम सहकारी संस्थांना सरकारच्या मदतीशिवाय अगर पाठिंब्या-शिवाय सहजीं उभारता येईल असें मला वाटत नाहीं. शिवाय

जरूर तेवढें खेळतें भांडवल उभारलें गेलें तरी दिलें जाणारें कर्ज वेळचे वेळीं वसूल करण्यासाठीं, तसेंच शेतकऱ्यांस हरकारणाकरितां लागणारें कर्ज वेळचे वेळीं पुरविण्यासाठीं लागणारा अनुभवी, कामसूं व निःस्वार्थबुद्धीनें काम करणारा पुरेसा व अल्प वेतनावर संतुष्ट राहणारा नौकरवर्ग या संस्थांना सहजी मिळवितां येईल किंवा कसें हा मोठा बिकट प्रश्न आहे. अशा परिस्थितींत सहकारी संस्थांकडून याबाबत अपेक्षित असलेली कामगिरी त्या योग्य प्रकारें पार पाडूं शकतील, असें मला तरी वाटत नाहीं.

श्री. आर. जी. सरैय्या यांनीं आपल्या प्रबंधांत जे विचार प्रदर्शित केले आहेत, ते इकडील कार्यकर्त्यांच्या नेहमीच्या विचारसरणीस धक्का देणारे असले तरी ते वस्तुस्थितिनिदर्शक असल्यानें त्यांचा निर्विकारपणें व सखोल विचार जरूर तर त्यासाठीं एकादी परिषद मुद्दाम भरवून त्या परिषदेंत केला जाऊन या संबंधींचें आपलें निश्चित मत मुंबई सरकारास वेळींच कळविणें हें येथील अनुभवी व कुशल कार्यकर्त्यांचें कर्तव्य आहे, असें मला वाटतें. पूर्वी घेतलेला निर्णय हा आलेल्या अनुभवावरून बदलणें भाग होत असेल तर तसें करण्यास कार्यकर्त्यांनीं मागें पुढें पहातां कामा नये अगर त्यांत त्यांनीं विनाकारण खोट्या इभ्रतीचा प्रश्नहि उत्पन्न करतां कामा नये. श्री. सरय्या यांनीं प्रस्तुत विषयासंबंधीं प्रदर्शित केलेलें मत हें केवळ त्यांचें वैयक्तिक नसून तें आपल्या राज्यांतील श्रेष्ठतम (अपेक्स) सहकारी बँकेच्या चालकांचेंहि आहे, असें मानावयाचें काय? सदर मत निर्विकारपणें व स्पष्टपणें जाहिर करून श्री. सरय्या यांनीं येथील कार्यकर्त्यांस वेळींच इशारा दिला असून त्यांना योग्य प्रकारें मार्गदर्शन केलें आहे. त्याबद्दल व्यक्तिशः श्री. सरय्या यांना धन्यवाद देणें जरूर आहे.

आपला,
दत्तात्रय दिवाकर चितळे.

## लिक्विडेशनमध्यें गेलेल्या हिंदी बँका

### १९४८ ते १९५०

| राज्य | बँकांची संख्या | भांडवल | | |
|---|---|---|---|---|
| | | अधिकृत (रु.) | खपलेलें (रु.) | वसूल (रु.) |
| १९५० मध्यें | | | | |
| आसाम ... | ३ | ६,२०,००० | १८,७१० | ८,६१३ |
| मुंबई ... | १ | १०,००,००० | ८१,४५० | ३५,७५५ |
| मद्रास ... | १४ | ४१,६०,००० | १३,०९,५१५ | १३,०६,२७५ |
| म्हैसूर ... | १ | १०,००० | ९,००० | ९,००० |
| ओरिसा ... | १ | १,००,००,००० | ... | ... |
| पंजाब ... | १ | २,००,००० | २,००,००० | १,९७,५०० |
| उत्तर प्रदेश | ३ | ३,२०,००० | ८०,६२० | ६९,३७० |
| प. बंगाल... | ९ | ४,१७,००,००० | १,२५,३८,४०० | ८८,४६,१५० |
| त्रावणकोर-कोचीन ... | ४ | १४,००,००० | २,३५,००० | १०,००० |
| फक्त हिंदी संघराज्य | | | | |
| १९५० ... | ३७ | ५,९४,१०,००० | १,४४,८०,७७५ | १,०४,८२,७४३ |
| १९४९ ... | ५० | ९,१५,८०,००० | १,६६,२२,७४१ | १,०७,६६,०३७ |
| १९४८ ... | ४१ | १२,४६,९४,००० | २,३८,८९,९८८ | १,७४,८१,१६३ |

१९५० मध्यें एकहि नवीन जॉइंट स्टॉक बँक नोंदण्यांत आली नाहीं किंवा एकाहि बँकेनें ह्या वर्षी बँकिंगच्या व्यवहारास नव्यानें प्रारंभ केला नाहीं.


# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बँक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

**१५ जिल्ह्यांत ६५ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

(मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित)

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

(स्थापना : १९२९)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर (जि. धारवाड)
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज (पे ऑफिस)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

## साखर उत्पादनाची प्रगति

गेल्या आठ वर्षांपेक्षां यंदा साखरेचें उत्पादन अधिक झालें. साखरेचें किमान उत्पादन १९४६–४७ या सालीं ९,०१,००० टन इतकें झालें, तर चालू हंगामांत ११,१०,०० टन इतकें उत्पादन झालें. सध्यांच्या साखर कारखान्यांचे गेल्या पांच वर्षांचे उत्पादनाचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत. त्यांची अंदाजी कमाल उत्पादनशक्ति १४ लाख टन आहे.

| | |
|---|---|
| १९४६–४७ | ९,०१,००० टन |
| १९४७–४८ | १०,७४,८०० टन |
| १९४८–४९ | १०,०७,००० टन |
| १९४९–५० | ९,७९,००० टन |
| १९५०–५१ (अंदाजी) | ११,१०,००० टन |

१९३१–३२ सालीं या धंद्यास संरक्षण देण्यांत आलें आणि लौकरच साखर कारखान्यांची संख्या ३० वरून झपाट्यानें वाढून १६८ वर गेली. यापैकीं दहा आतां पाकिस्तानांत आहेत.

भारतांतील दर वर्षी दर माणशीं साखरेचा वापर केवळ ३० रत्तल (२४ रत्तल गूळ व ६ रत्तल साखर) असल्यामुळें या देशांत या धंद्याच्या विकासास भरपूर वाव आहे. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड व अमेरिका या देशांत हेंच प्रमाण अनुक्रमें ११६ रत्तल, १०६ रत्तल व ९७ रत्तल असें आहे. लोकसंख्येंतील वाढ, खेडुत जनतेचें शहरी विभागांत स्थलांतर, राहाणी–मानांत वाढ इत्यादींमुळें गेल्या दहा वर्षांत साखरेच्या मागणींत बरीच वाढ झाली आहे. सध्यांचें उत्पादन व वाढती मागणी यांमधील तूट भरून काढण्यासाठीं भारत सरकारनें १६ लाख टन उत्पादनाचें लक्ष निश्चित केलें. दर दिवशीं सरासरी ८०० ते १,००० टन ऊंस गाळण्याची शक्ति असलेले साखरेचे ४५ नवीन कारखाने निरनिराळया राज्यांत सुरू करण्याची परवानगी देण्यांत आली. २४ नवीन कारखाने उभारण्यासाठीं जागांची निवड करण्यांत आली आहे. मुंबई व मद्रास हीं राज्यें उसाच्या लागवडीचे दृष्टीनें सोयीस्कर असल्यामुळें या राज्यांत या धंद्याची वाढ करण्यास भारत सरकार उत्तेजन देत आहे.

जगांतील इतर ठिकाणांपेक्षां भारतीय कारखान्यांची कार्यक्षमता कमी नसली तरी उसाच्या जागतिक किंमतीशीं तुलना करतां भारतीय साखरेच्या उत्पादनाचा खर्च जास्त आहे. यास पुढील गोष्टी कारणीभूत आहेतः—(१) उसाचें एकरीं कमी उत्पादन. (२) साखरेचें दर टन उंसामागें तौलनिक दृष्टया कमी उत्पादन. (३) उसाच्या महाग किंमती. (४) उत्पादनाच्या व मजुरीच्या खर्चांतील वाढ. (५) या धंद्यांतील उपपदार्थांचा पूर्णपणें न होणारा वापर. साखरेच्या उत्पादनास येणाऱ्या खर्चापैकीं ७० टक्के खर्च उसावर येतो. म्हणूनच साखरेवर येणाऱ्या खर्चांतील घटीनुसार उसाची किंमतहि कमी करावी लागते. चांगल्या जातींची लागवड करून, उसाचें एकरीं उत्पादन वाढवून व साखरेचें दर मण उसामागील उत्पादन वाढवून ही गोष्ट साध्य करतां येईल. हें साध्य करण्यासाठीं एका पंचवार्षिक योजनेनुसार उंसाची लागवड होणाऱ्या सर्व राज्यांत ऊंस–विकास व संशोधनाच्या योजना चालू करण्यांत आल्या आहेत. यासाठीं भारत सरकारनें ७५ लाख रुपये खर्चास मंजुरी दिली आहे. एवढीच रक्कम राज्य सरकारेंहि खर्च करतील अशी अपेक्षा आहे. या व्यतिरिक्त आणखी १५० लक्ष रुपये ऊंस उत्पादकांस आणि साखरेच्या धंद्याच्या हिताच्या योजनांना साहाय्य देण्यासाठी मंजूर करण्यांत आले आहेत.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
३, ५, १० वर्षें सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकिटें
दर ९३–८, ८७–८, ७५ अनुक्रमें.
हेड ऑफिस–गिरगांव, मुंबई

## टाटा आयर्न अँड स्टील कं. लि.

३१ मार्च, १९५१ अखेरचा संक्षिप्त ताळेबंद

| देणें | लक्ष रु. | जिंदगी | लक्ष रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | १०,४७·२४ | फिक्स असेटस् | |
| रिझर्व्ह व इतर फंड | ११,७२·७१ | (पडलेली किंमत) | ४२,७५·४१ |
| घसारा फंड | २७,६०·८५ | स्टॉक्स व स्टोअर्स | ११,४१·०७ |
| कामगारांचे फंड | १४·७४ | येणीं, ॲडव्हान्सेस | ५,६४·५१ |
| ठेवी व कर्जें | २,५०·१३ | आगाऊ भरलेला कर | १,०७·१५ |
| कराची तरतूद | २,५७·०६ | इनव्हेस्टमेंटस् | २,७९·५७ |
| इतर देणीं | १२,१९·६४ | कॅश | ६,२४·८७ |
| देणें व बोनस | १,०१·९३ | | |
| डिव्हिडंड रिझर्व्ह | १,६६·६२ | | |
| | ६९,९३·०० | | ६९,९३·०० |

कंपनीचे भागीदार व भाग
(३१–३–१९५१)

| | भागीदारांची संख्या | त्यांच्या भागांची दर्शनी किंमत | दर्शनी किंमतीचें प्रमाण % |
|---|---|---|---|
| व्यक्ती | २८,०९३ | ६,९०,७३,२१५ | ६६·०४ |
| बँका | ५८ | ९९,२९,८९५ | ९·०४ |
| विमा, औद्योगिक कं. | १४६ | १,५७,१६,५९० | १५·०३ |
| इतर | २६४ | ९८,७४,७०० | ९·४४ |
| | २८,५६१ | १०,४५,९४,४०० | १००·०० |

## शेतकरी कर्जनिवारण कायद्याखालील महत्त्वाचा निर्णय

### कर्ज विभागणीमुळें वारस 'डेटर' ठरूं शकतील काय?
### (मुंबई हायकोर्टाचा निवाडा)

सोलापूर जिल्ह्यांतील नागोची वाडी येथील विठोबा गेनू नांवाचा शेतकरी मरण पावला. त्याच्या मागें त्याचे तीन मुलगे व विधवा बायको होती; आणि १५,००० रुपयांपेक्षां जास्त कर्ज होतें. शेतकरी कर्ज–निवारण कायद्याखालीं जो स्वतः शेती करीत असेल व ज्याचें कर्ज १५,००० रुपयांपेक्षां कमी असेल त्यालाच कर्ज–निवारणासाठीं सवलती मिळूं शकतात. वांटणीमध्यें प्रत्येक मुलाला १५,००० पेक्षां कमीच कर्ज आलें. तेव्हां त्यांनीं सावकारांविरुद्ध कर्ज–विमुक्ततेसाठीं अर्ज केला. सोलापूरच्या सिव्हिल जज्जांनीं अशा प्रकारच्या कर्जवांटणीमुळें कर्जमुक्ततेची सवलत मिळणार नाहीं असा निकाल दिला; पण आपिलांत डिस्ट्रिक्ट जज्जसाहेबांनीं कर्जाची वांटणी झाल्यामुळें 'डेटर' ठरतां येतें असा निर्णय दिला. तेव्हां सावकारांनीं मुंबई सरकारकडे दाद मागितली.

स्वतः विठोबा जिवंत असता तर त्याला कांहीं फायदा मिळाला नसता; म्हणून त्याच्या मुलांमध्यें कर्ज जरी वांटून गेलें तरी त्यामुळें त्यांना 'डेटर' ठरून कर्ज निवारण्याच्या बाबतच्या सवलती मागता येणार नाहींत, असा प्रधान न्यायमूर्ति श्री. छागला ह्यांनीं निर्णय दिला. स. वा. दा.

## सिंद्री येथील खताचा कारखाना

### रासायनिक धंद्याच्या उभारणीचा पाया

सिंद्री (बिहार) येथील सरकारी मालकीचा खताचा कारखाना सप्टेंबर, १९५१ मध्यें सुरू होईल, अशी अपेक्षा आहे. कारखान्यांत दररोज १ हजार टन अमोनियम सल्फेटचें उत्पादन होऊं शकेल. म्हणजे, वार्षिक उत्पादनशक्ति ३½ लक्ष टन आहे. अमोनियम सल्फेट तयार करण्याचे आपल्या देशांत सध्यां ६ छोटे कारखाने असून त्यांची वार्षिक उत्पादनशक्ति ८० हजार टन आहे. सिंद्री हें गांव धनबादपासून १४ मैलांवर आहे. त्या शहराच्या उभारणीसाठीच १ कोटि, ७९ लक्ष रु. खर्च आला आहे. कारखान्याच्या आराखड्याचें व बांधकामावरील देखरेखीचें काम एका अमेरिकन फर्मकडे आहे. त्याच्या देखरेखीखाली उभारणीचें काम एक ब्रिटिश फर्म करते आणि कारखाना प्रत्यक्ष चालविणाऱ्या वरिष्ठ इंजिनिअरांत ब्रिटिश, जर्मन व जपानी तज्ज्ञ आहेत. बाकीचा नोकरवर्ग भारतीयच आहे!

---

### ऑइल इंजिन चालविण्याच्या कामाचें शिक्षण

मुंबई राज्यांत धारवाड, बडोदें आणि धुळें अथवा जळगांव या ठिकाणीं ऑइल इंजिन चालविण्याच्या कामाच्या शिक्षणाचे आणखी तीन वर्ग उघडण्यांत येणार आहेत. हे वर्ग येत्या १ ऑक्टोबरपासून सुरू होतील व प्रत्येक वर्गांत २५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय होईल सध्यां पुणें येथें चालू असलेल्या वर्गाच्या धर्तीवरच हे वर्ग चालविण्यांत येतील. वर्गाची मुदत तीन महिन्यांची असून विद्यार्थ्यास त्यासाठी २५ रु. फी पडेल. पुण्याच्या वर्गांतील विद्यार्थ्यांनाहि १ ऑक्टोबरपासून येवढीच फी आकारण्यांत येईल. या नव्या वर्गांना सुरवातीस एक वर्षापुरती मंजुरी मिळाली असून चालू आर्थिक सालीं त्यासाठी अंदाजे ८८,७२५ रुपये खर्च होईल.

---

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यांतील सर्व सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास, नाशिक रोड विविध कार्यकारी सोसायटीचे ऑफिसांत, ता. १५-८-१९५१ ते २१-९-१९५१ अखेर मुदतीचा घ्यावयाचा आहे. ज्या उमेदवारांस सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं नाशिक रोड विविध कार्यकारी सोसायटी अगर खालील सही करणार यांजकडे ता. १४-८-१९५१ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास-फी रु. ३ लगत पाठवावी. उमेदवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेदवारास सदर शिक्षण स्वःखर्चानें घ्यावें लागेल. क्लास-फी भरल्यानंतर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासनंतर परीक्षेंत यशस्वी उमेदवारांना सेक्रेटरी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल. उमेदवारांनीं नाशिक रोड येथें नाशिक रोड विविध कार्यकारी सोसायटीच्या ऑफिसांत समक्ष ता. १५-८-५१ रोजीं सकाळीं ११ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

एन. वाय. कुलकर्णी
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर,
(घर नं. २१७८, मधली होळी), नाशिक


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. १४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खवडे
मॅनेजिंग डायरेक्टर

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)
स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथायोग्य बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.